प्रधानमंत्री पीक विमा योजनेचे मूल्यमापन विशेष संदर्भ भोकर तालुका (२०१६ ते २०२५)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी. (विद्यावाचस्पती)

पदवीसाठी सादर केला जाणाऱ्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

-: संशोधक :-

मारोती गंगाधर अक्कलवाड

(एम.ए. अर्थशास्त्र. बी.एड)

-: मार्गदर्शक :-

प्रा.डॉ. माधवराव नरसिंगराव बिरादार

सहयोगी प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग

दिंगाबरराव बिंदू कॉलेज, भोकर

-: संशोधन केंद्र :-

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

प्रस्तावना

प्राचीन काळापासून कृषि ही भारतीय जनतेची जीवन पद्धती म्हणूनच राहिलेली आहे, आणि आजही भारतीय जनतेसाठी ते उपजीविकेचे सर्वात मोठे साधन/क्षेत्र आहे.स्वातंत्र प्राप्तीनंतर, भारत सरकारचे कृषि विकासाचे धोरण प्रामुख्याने अन्न उत्पादनात स्वयंपूर्णता व स्वावलंबन प्राप्त करण्याच्या अनुषंगाने आखले गेले. त्यानुसार बरीच प्रगती झाली आहे, व कृषि क्षेत्रात मोठे संरचनात्मक बदल झालेले आहेत. मात्र, आजही कमी उत्पादकता, भांडवल निर्मितीची दर कमी, मान्सूनवरील अवलंबन, सिंचनाचे कमी प्रमाण, यांत्रिकीकरणाचे अल्प प्रमाण, कृषि वित्ताची कमतरता, यांसारखे अनेक प्रश्न शेतीसमोर आहेत.भारताची अर्थव्यवस्था आजही मोठ्या प्रमाणात कृषिप्रधान आहे. उद्योग व सेवा क्षेत्रांचा मोठा विकास झालेला असला तरी, कृषि क्षेत्र त्यांच्या विकासासाठी एक मर्यादक घटक (a limiting factor) म्हणून कार्य करते. म्हणजेच, कृषि क्षेत्र अविकसित राहिल्यास उद्योग व सेवा क्षेत्रांच्या विकासावरही मर्यादा येतात.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी, कृषि व संलग्न क्षेत्राचा जी.डी.पी.मधील हिस्सा ५० टक्क्यांहून अधिक होता. त्यानंतर तो घसरत गेला. गेल्या काही वर्षातील भारताच्या स्थूल मूल्यवर्धीतामधील (Gross value Added: GVA) कृषि व संलग्न क्षेत्राचा हिस्सा कमी होताना दिसतो. कृषि व संलग्न क्षेत्राचा जी.डी.पी.मधील घटता हिस्सा अर्थव्यवस्थेतील सकारात्मक संरचनात्मक बदल प्रदर्शित करतो.विकसित औद्यागिक राष्ट्रांमध्ये कृषि व संलग्न क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा ३-४ टक्क्यांपेक्षा कमी असतो, मात्र तांत्रिक प्रगतीमुळे ही राष्ट्र देशातील जनतेच्या अन्नधान्याची गरज भागवून निर्यातीसाठी अतिरिक्त उत्पादन करू शकतात. कृषि हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. भारतीय लोकसंख्येच्या सर्वात मोठ्या गटाचा तो व्यवसाय आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी देशातील ७० टक्क्यांहून अधिक लोकसंख्या कृषि व संलग्न क्षेत्रांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून होती. मात्र, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासाबरोबर कृषिवरील अवलंबित्व कमी होत आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या वेळी भारतीय कृषिची दशा शोचनीय होती. भारतीय कृषि पारंपरिक व निर्वाहक प्रकारची होती, ज्यामध्ये खाद्य पिकांचे प्राधान्य होते. फाळणीमुळे गव्हाखालील ३० टक्के, भाताखालील २८ टक्के, ज्यूटखालील ७६.६ टक्के, तर कपाशीखालील २६.६ टक्के क्षेत्र पाकिस्तानात गेल्याने या पिकांचाही प्रश्न निर्माण झाला होता.तत्कालीन कृषि समस्यांमध्ये पुढील बाबींचा समावेश होता, कर्जबाजारीपणा, छोटे व विखुरलेले धारण क्षेत्र, मान्सूनवर पूर्ण अवलंबित्व, पारंपरिक पद्धतीने शेती, जमीन व कामगारांची अल्प उत्पादकता इत्यादी. ७० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या कृषिमध्ये गुंतलेली असल्याने देश अन्नधान्यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण नव्हता. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून देशाचा आर्थिक विकास साध्य करण्याचे धोरण स्विकारले.

कृषि हा राज्य सूचीतील विषय असून कृषि उत्पादन व उत्पादकता वाढविण्याची प्राथमिक जबाबदारी राज्य शासनांची आहे. मात्र, राज्य शासनांच्या प्रयत्नांना पूरक म्हणून विविध केंद्रीय व केंद्र-पुरस्कृत योजना देशात चालविण्यात येत आहेत.

शेती हि पूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्यामुळे प्रचंड नुकसान होऊन त्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे. अशा परिस्थितीत आधार देण्यासाठी पीक विम्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यानी आपल्या जवळील सर्व पैसा शेतीत लावल्यानंतर नैसर्गिक आपत्तीमुळे जर त्यांचे सपूर्ण आर्थिक नुकसान झाले, तर

शेतकऱ्यांच्या उत्पन्नाची पातळी खालावते. पीक विमा योजनेमुळे त्यांच्या उत्पन्नात स्थैर्य येऊन त्यांच्या जीवनमानाची पातळी देखील स्थिर राहते. शेती व शेतकऱ्याची वित्तीय अडचण दूर करण्यासाठी त्रिस्तरीय सहकारी बँका' ची निर्मिती करण्याबरोबरच प्रादेशिक ग्रामीण बँकेची स्थापना करण्यात आली. सहकारी बँकां या शेती विकासासाठी प्राधान्य देतात, शेतीसाठी कर्ज पुरवठा करतात.

१२ जुलै १९८२ रोजी नाबार्ड (NABARD) तर कृषी क्षेत्रातील 'शिखर बँकेची स्थापना करून कृषीसाठी मोठ्या प्रमाणात विमा पुरवठा व कृषी क्षेत्रात गुंतवणूक झाली. यामुळे कृषी क्षेत्राचा विकास साधण्यास मदत झाली. 'नाबार्ड' हि कृषी शेताला मोठ्या प्रमाणात आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मदत करणारी महत्व पुर्ण बैंक आहे.

१९६५-६६ मध्ये झालेल्या 'हरित क्रांती' मुळे शेतीबाबत बदल होत गेला. विविध संकरित वाणाची निर्मिती व त्याचा वापर जपानी पध्दतीनी भात लागवड पध्दतीचा वापर, आधुनिक रासायनिक खताचा, बि-बियाणे, किटकनाशकांचा वापर, यांत्रिकीकरणाचा वापर, ठिबक व तुषार सिंचन या पाणी देण्याच्या सुधारित पध्दतीने उत्पादनात वाढ तर झालीच परंतु वेळ व पाण्याची बचत झाली. यामुळे शेती उत्पन्न वाढत आहे.

भारतीय हरित कांती चे जनक म्हणून आपण एम. एस. स्वामिनाथन याना ओळखतो तर महाराष्ट्राच्या हरित काती चे जनक म्हणून वसंतराव नाईक यांना ओळखतो, महाराष्ट्र हे एकेकाळी शेतीबाबत मागास राज्य होते , शेती व्यवसायात पीक विमा ही महत्वाची भूमिका बजावते. महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या शेतकऱ्याप्रमाणेच नांदेड जिल्हयातील 'भोकर' तालुक्यातील शेतकरी सुध्दा पीक विमा काढण्यात अग्रेसर आहेत. पीक विम्याचे महत्त्व जाणून आहेत, पीक विमा नादेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील शेतकर्यासाठी कितीपत वरदान ठरला आहे. याचा आढावा प्रस्तुत संशोधनाच्या माध्यमातून घेण्यात येणार आहे. भोकर तालुका हा मराठवड्यातील नांदेड जिल्हयातील पाण्याच्या बाबतीत निसर्गावर अवलंबून असलेला तालुका आहे. भोकर तालुक्यातील शेतकर्याच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम याचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे , या योजनेचे मूल्यमापन करण्यात येणार आहे..

संशोधन विषयाचे महत्व

केंद्र व राज्य सरकारच्या सहयोगाने १९८९ साली 'पायलट पिक विमा योजना' स्वर्गीय राजीव गाधी पंतप्रधान असताना सन १९८५ मध्ये केंद्र शासनाने देशात ही योजना सुरु केली. १९९७-१९९८ साली प्रायोगिक पीक विमा योजना राबविण्यात आल्या. वरील सर्व योजना विशिष्ट पिके आणि विशिष्ट प्रदेशा पर्यतच मर्यादित होत्या ही कमतरता दूर करून राष्ट्रीय पातळीवर देशातील सर्व शेतकऱ्यांना कृषी उत्पादनातील जोखीमेपासून सुरक्षा देण्यासाठी १९९९-२००४ च्या खरीप हंगामापासून सर्वसमावेशक अशी 'राष्ट्रीय पिक विमा योजना' प्रारंभ केली आहे. एप्रिल २०१६ मध्ये पंतप्रधान पीक विमा योजना सुरु करण्यात आली. यामुळे शेतीतील पिकांना संरक्षण प्राप्त झाले आहे.. ज्यामुळे शेतीला नवसंजीवनी देण्याचे कार्य ही योजना करत आहे. निसर्गामुळे होणारे शेतीतील पिकांचे नुकसान भरपाई दिली जात आहे… यामुळे शेती करणे हे नुकसानीची नसून फायदेशीर ठरत आहे.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेचे उद्देश

१) शेतकऱ्यांना शेती करत असताना निसर्गातील होणाऱ्या नुकसानी पासून संरक्षण देणे

२) नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकाचे नुकसान झाल्यास नुकसानीच्या प्रमाणात शेतकरयांना विमा संरक्षण देणे

३) पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राखणे

४) शेती उत्पादनात स्थैर्य प्राप्त करण्यासाठी मदत करणे

५) माफक दरात सुरक्षा प्रदान करणे

६) मानव निर्मित आपदापासून आर्थिक संरक्षण देणे.

संशोधन विषयाची निवड

मराठवाडा विभागामध्ये ८ जिल्हे आहेत. या आठ जिल्ह्यापैकी एक महत्वाचा जिल्हा म्हणून नांदेड कडे पाहिले जाते. नांदेड मधील भोकर तालुक्यातील अर्थव्यवस्था कृषी क्षेत्रावर आधारित आहे. शेतक-यांकडे शेतीत सुधारणा करण्यासाठी पुरेसे भांडवल नाही. यासाठी खासगी सावकाराकडे जावे लागते. शेती व्यवसायातील विविध खर्चामुळे शेतकरी कर्जात जातो. तसेच विविध आपत्तीमुळे शेती व्यवसाय करण्यास असमर्थ ठरतो. भोकर तालुक्यात विविध स्वरूपाची शेती पिके घेतली जातात. कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, तीळ, जवस, किंवा ऊस असेल. अशा विविध पिकांवर रोग, अति पाऊस यासह दुष्काळ, अतिष्टी यामुळे नुकसान मोठ्या प्रमाणावर होते. या कारणास्तव पंतप्रधान पीक विमा योजनेचा नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील शेतकऱ्यांवर झालेल्या परिणामांचा अभ्यास या विषयावर लक्ष केंद्रित केले आहे. या योजनेचे मूल्यमापन करण्यात येणार असून या योजनांचा फायदा किती शेतकरयांना झाला आहे , सर्वांपर्यंत ही योजना पोहचली आहे का ? यामुळे या योजनेवर लक्ष केंद्रीत केले आहे.

संशोधन विषयाची उदिष्टेः-

1) कृषी विकासात प्रधानमंत्री पीक विमा योजनेचे महत्त्व अभ्यासणे,

२) देशातील व महाराष्ट्रातील पीक विमा योजनेचा हंगाम निहाय (खरीप व रब्बी) अभ्यास करणे.

३) नांदेड जिल्ह्यातील तालुकानिहाय या योजनेचा अभ्यास करणे.

४) भोकर तालुक्यातील लाभ घेतलेल्या शेतकर्यांच्या आर्थिक स्थितीत पीक विमा योजनेमुळे झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

५) महाराष्ट्र शासनाची १ रू पीक विमा योजना चा अभ्यास करणे.

६) पंतप्रधान पीक विमा योजनेतील समस्याचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे,

संशोधन कालावधी

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनाचा वापर करण्यात येणार आहे. निवडलेल्या लाभधारक शेतकऱ्यांना प्रश्नावलीच्या मदतीने त्याच्या शेती व्यवसायात प्रधानमंत्री पीक विम्याची मदत किती झाली याचा अभ्यास केला जाणार आहे. तर द्वीतीय माहिती २०१६ ते २०२५ मधील विविध अहवाल तसेच लेख, महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल, केंद्र सरकारने दिलेली विमा रक्कम महाराष्ट्र शासनाची १ रू पीक विमा योजना या आधारे माहिती मिळवली जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही शेती व्यवसायात पंतप्रधान पीक विम्याच्या योगदानापुरती आहे. पीक विमा राष्ट्रीय स्तर, महाराष्ट्र स्तर यांचा विचार केला जाईल. परंतु विशेष रुपाने नांदेड जिल्हयातील भोकर तालुक्याचा अभ्यास केला जाईल.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी शेती विकासात पंतप्रधान पीक विमा योजनेचे भोकर तालुक्यातील शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणाम चे मूल्यमापन करण्यात येणार आहे विशेष संदर्भ २०१६ ते २०२५ या कालावधी ची निवड केली आहे. या संशोधनासाठी विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे. तथ्य संकल्पनासाठी खालील साधनाचा वापर केला आहे.

प्राथमिक स्त्रोत

या पद्धतीत संशोधकाने निश्चित केलेल्या संशोधन विषयाशी संबंधित क्षेत्रात स्वतः जाऊन तेथील लाभधारक शेतकऱ्यांशी संपर्क साधून प्रश्नावली व अनुसूचीच्या माध्यमातून माहिती जाणून घेण्यात येणार आहे. आर्थिक स्थितीवर किती प्रमाणात परिणाम झालेला आहे याचा सविस्तर अभ्यास केला जाणार आहे.

दुय्यम स्त्रोत

दुय्यम स्त्रोत ज्यामध्ये सामग्री संग्रहन पद्धतीचा अवलंब केला आहे. तलाठी कार्यालय, शासकीय कार्यालये, तालुका व जिल्हा कृषी कार्यालये, शासनाचे कृषी विषयक अहवाल व नियतकालिके, जिल्हा सांख्यिकी अहवाल, आर्थिक व सांख्यिकीय समालोचन, भारतीय रिझर्व बँकेचे अहवाल, वेबसाईट, केंद्र सरकारचा निधी, इत्यादी प्रकाशित व अप्रकाशित साहित्याचा वापर केला जाईल.

नमुना निवड पद्धती

संशोधन एककांची संख्या जास्त असते. त्यावेळी त्या समग्रातील एककांचा छोटासा नमुना गट निवडला जातो. त्या नमुना गटातील समस्येशी संबंधित निष्कर्ष काढले जातात. त्यास नमुना निवड म्हणतात. नांदेड जिल्ह्यातील भोकर तालुक्यातील लाभधारकांचा विचार करता स्थरित यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे. तालुक्यातील लाभधारक घेत असताना द्विस्तरीय रचना केली आहे.

प्रथम स्तर

भोकर तालुक्यातील गावाची निवड ही साधा यादृच्छिक पद्धतीने केली जाणार आहे.

द्वितीय स्तर

तालुक्यातील प्रत्येक गावाची निवड साधा यादृच्छिक पद्धतीने केली जाणार आहे. व तालुक्यात एकुण गावाची संख्या ८१ असुन त्यापैकी ४० ग्रामपंचायत असलेल्या गावात प्रत्येकी १० लाभार्थी निवड करण्यात येणार आहे, एकुण ४०० लाभार्थी निवड करण्यात येणार आहे, हे लाभार्थी निवडताना त्यांची माहिती घेवून अनुसूचीच्या, प्रश्नावलीच्या आधारे सर्वेक्षण केले जाईल व निवड केली जाईल.

सांख्यिकीय तंत्र :-

सदरील विषयानुसार विविध घटकांचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, साध्या वाढीचा दर इत्यादी अनेक सांख्यिकीय तंत्राचा वापर करून तक्ते व आलेखाच्या सहाय्याने उद्दिष्टानुरुप अभिवृत्ती शोधण्यात येणार आहेत.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात प्रस्तावना, जागतीक पातळीवर शेतीचे महत्त्व, शेती समोरील आव्हाने, भारतीय शेती व्यवसाय महत्त्व, भारतीय शेती व्यवसायात झालेला बदल, महाराष्ट्रातील शेती व्यवसाय, तसेच भारतीय शेती व्यवसायावर झालेला हवामानाचा बदल या बदलाचा शेती अर्थ व्यवस्थेवर झालेला परिणाम, पीक विमा पध्दतीची कार्य आवश्यकता, महत्त्व जागतिक स्तरावर पीक विम्याची सुरुवात, भारतातील पीक विमा योजनेची ऐतिहासिक पार्श्वभूमी, महत्त्व, महाराष्ट्रातील पोक विमा योजनेची स्थिती, योजना राबविताना येणाऱ्या समस्या, तसेच नांदेड जिल्ह्यातील पीक विमा योजनेविषयी माहिती. व या योजनेस असलेल्या पूरक योजनांची माहिती.

प्रकरण दुसरे

संशोधन पद्धती व साहित्याचा आढावा

प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रास्ताविक संशोधनाचा हेतू, संशोधनाची उिद्दष्ट्ये, महत्त्व, गृहितके, संशोधनाची व्याप्ती, मर्यादा, संशोधनाचा कालखंड, संशोधन समस्या, संशोधन पध्दती, नमुना निवड व संदर्भ साहित्यामध्ये विविध संशोधकांनी संशोधन करुन काढलेले निष्कर्ष व शिफारशी याची माहिती घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

भोकर तालुक्याचे आर्थिक व सामाजिक वैशिष्ट्य.

प्रस्तुत प्रकरणामध्ये भोकर ची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान, प्राकृतिक रचना, भुमी, हवामान, लोकसंख्या, वनक्षेत्र, नद्या, मृदा, जमिनीचा वापर, पीक पदधती, इ. अनेक घटकांचे अध्ययन करण्यात येणार आहे. भोकर तालुक्यांतील आजपर्यंतची शेती विकासाबाबत अभ्यास, त्यासोबतच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय स्थिती इ.चा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे

भोकर तालुक्यांतील पीक विमा योजनेचे आर्थिक विश्लेषण

(द्वितीय सामुग्रीवर आधारित)

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधन कालावधीतील पीक विमा योजनेमुळे लाभार्थी शेतक-यांवर झालेल्या आर्थिक परिणामांचा अभ्यास, केंद्र शासनाचे विविध अहवाल, महाराष्ट्र शासन आर्थिक पाहणी अहवाल, कृषी विभागाचे विविध अहवाल, संकेतस्थळावरील माहिती व कृषी विमा कंपनीच्या आकडेवारीच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे. लाभधारक शेतकरयांना किती फायदा या योजनेचा झाला याबतची विमा कंपनीकडून देण्यात येणारी माहिती, तालुका व जिल्हा कृषी कार्यालयाची याबाबतची माहिती.. विश्लेषण कऱण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे

भोकर तालुक्यांतील प्रधानमंत्री पीक विमा योजनेचे प्राथमिक सामग्री वर आधारित आर्थिक विश्लेषण

प्रस्तुत प्रकरणामध्ये अध्ययनासाठी निवड करण्यात आलेल्या पीक विमा योजनेच्या 400 लाभधारकांकडून प्रश्नावली भरून घेण्यात येणार आहे. तसेच अनुसुचीच्या आणि मुलाखतीच्या आधारे, सांख्यिकीय माहितीच्या आधारे, सुक्ष्म अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तूत प्रकरणामध्ये संपूर्ण संशोधन अहवालाचा निरिक्षणात्मक व चिकित्सक अभ्यास करुन निष्कर्ष काढण्यात येणार आहेत, व त्याचबरोबर या निष्कर्षावरुन संशोधकाला अभ्यासाअंती ज्या शिफारशी योग्य वाटतील त्या मांडण्याचा प्रयत्न सदरिल प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

संदर्भग्रंथ सूचीः

१) डॉ. कानेटकर मेधा, 'भारतीय अर्थशास्त्र' , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

2) पुरोहित वसुधा, 'कृषी अर्थशास्त्र' विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

3) सुधीर बोधनकर, 'सामाजिक संशोधन पध्दती' , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

4) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकीय संचलनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन २०१६-२०२५

5) प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी, 'भारतीय अर्थव्यवस्था' विद्या बूक्स पब्लिशर्स,

6) Economic Survey-२०१६-२०२५ Ministry of Agricultural Gov. of India

7) Singh Gurudev, Crop Insurance in India, Indian Institute of Management

संशोधक

मारोती गंगाधर अक्कलवाड

मार्गदर्शक

प्रा. डॉ. माधवराव नरसिंगराव बिरादार

प्राध्यापक तथा मार्गदर्शक

दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर